**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलट तपास गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्रीमती आर.एस. सोनकांबळे यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरू:–**

दिनांक २२.११.२००९ ला माझे गैरअर्जदार क्र. १ सोबत माझे लग्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आत्याचा मुलगा आबा कदम यांच्याशी लग्न जुळले होते परंतू त्यांने नकार दिल्याने गैरअर्जदार क्र.१ शी लग्न ठरले. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांच्या वडीलांनी लग्नाचा सर्व खर्च उचलून लग्न उदगीर येथे लावून दिले. माझे लग्न उदगीर येथे झाले. योगेशचे वडील हे माझे नात्याने मामा लागत. हे म्हणणे खरे नाही की, योगेशच्या वडीलांनी लग्न उचलून घेतले होते. गैरअर्जदार यांनी लग्नामध्ये पाटल्या, गळयातील हार व कानातील केलेले होते. लग्नामध्ये आमच्याकडून दोन तोळे सोने दिले, त्याची पावती मी अर्जाच्या कामी दाखल केली नाही. या अर्जाच्या कामी लग्नात दिलेल्या भेट वस्तूच्या पावत्या मी दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये आमच्या कडून अडीच लाख हुंडा व भेट वस्तू दिल्या होत्या हे मी खोटे सांगत आहे. लग्नानंतर २०१८ पर्यंत मी येवून–जावून गैरअर्जदार सोबत राहिले व २०१८ नंतर त्यांनी घरातून काढून दिल्यानंतर मी नांदायला गेले नाही. अर्जदार क्रमांक ०२ चा जन्म एप्रिल, २०१४ ला झाला.

अमोल आणि विशाल लग्न होण्यापुर्वी व लग्नानंतर पण चौबारा येथे राहायला होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी मला आनंदात ठेवले. बलदेव कदम यांच्या जन्मापूर्वी व जन्मानंतर पण मला त्रास झाला त्याबद्दल मी पोलिस स्टेशनला जावून तक्रार दिली नाही. गैरअर्जदार यांच्या लोकांनी मोटार सायकल दिली नाही. मानपान म्हणून काही दिले नाही. अशी जी मागणी केली आहे त्यांच्या तारखा मी नमुद केल्या नाहीत. बलदेव हा

माझ्याकडे होता पण गैरअर्जदार यांनी जबरदस्तीने त्याचा ताबा घेतला आहे. त्याबद्दल मी पोलिसात तक्रार केलेली आहे. बलदेव सध्या माझ्याशी त्यांच्या मानसीकतेमुळे बोलत नाही. गैरअर्जदार हा पुर्वी बलदेवचा खर्च करत नव्हता. आता तो त्यांचा खर्च निभावतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे गैरअर्जदार क्र.२ हिच्याशी सतत भांडण व्हायचे. मी गैरअर्जदार कडे राहत असताना मला घरातून बाहेर काढायचे, आत जाण्याचा प्रयत्न करत असताना सासू दारासमोर बसायची त्यामुळे मी मंदीरात बसायची. गैरअर्जदार यांनी पैसे दिले नाहीत तर फारकत दयायची धमकी दिली त्याची तारीख वार मी सांगू शकत नाही. समुपदेशन केंद्रामध्ये बोलणी झाल्यानंतर त्यांनी मला नांदायला घेवून गेले नाहीत. त्यांनी मला नांदवायला घेवून गेले नाहीत म्हणून मी पोलिसात तक्रार केली नाही. मला जखम झाली त्यामुळे मला नउ टाक्के पडले तो व्रण माझ्या उजव्या हाताला कोपराजवळ आहे. तो व्रण मला गैरअर्जदार यांने ढकल्यामुळे काच लागून कापले होते. त्यांचा दाखला मी या अर्जाच्या कामी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वडीलासोबत मोटर सायकल वरुन जाताना मला अपघात झाला होता. २००८ साली गैरअर्जदार क्र. १ च्या मनाप्रमाणे हुंडा मिळाला नाही म्हणून वडीलांनी त्यांच्या मताने लग्न लावले म्हणून आणि त्यांची पंसती नसल्याने त्यांनी मला काढून दिले.

हे म्हणणे खरे नाही की, योगेशच्या घरातल्यानी मला कधी हाकलून दिले नाही. माझी आईने योगेशच्या वडीलाविरुध्द जमीनीत हिस्सा मिळण्यासाठी दावा केला. हे म्हणणे बरोबर आहे की, आईच्या दाव्यामध्ये तडजोड झाली त्यामध्ये मला एक एकर आणि बलदेव याला एक एकर क्षेत्र त्या तडजोडी मध्ये दिले आहे. गैरअर्जदार क्र.१ यांच्या नावावर एकही एकर जमीन नाही कारण त्यांने त्यांची जमीन विकली आहे. हे म्हणणे खरे नाही

की, हा अर्ज व इतर कार्यावाही उचलून घेण्यासाठी एक एकर जमीन माझ्या नावावर व एक एकर माझ्या मुलाच्या नावावर करुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

न्यायदंडाधिकारी प्र.व.

दिनांकः– ०८.०१.२०२६ (न्यायालय क्रं. १), उदगीर.